महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

शुक्रवार ❖०८ नोव्हेंबर २०२४ ❖वर्ष ६ ❖अंक १३३❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::

९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com
news.thanejeevandeep@gmail.com

## विजयानंतर ट्रम्प आणि मोदींचा फोनवर संवाद




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**नवी दिल्ला(वृत्तसेवा) :**

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी पुन्हा एकदा डोनाल्ड ट्रम्म निवडून आले आहेत. त्यामुळे जगभरातील राष्ट्रप्रमुखांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी थेट ट्रम्म यांना फोन करुन त्यांच्याशी संवाद साधला आणि त्यांना विजयाच्या शुभेच्छाही दिल्या. आपल्या या फोनवरील संभाषणाची माहिती त्यांनी ट्विट करुन दिली आहे. यामध्ये त्यांनी माझ्या मित्रासोबत चांगला संवाद झाल्याचं म्हटलं आहे.

**मोदी-ट्रम्प यांच्यात काय झाला संवाद?**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करुन ट्रम्प यांच्याशी फोनवरुन बोलणं झाल्याचं सांगितलं तसंच त्यांना शुभेच्छा देताना म्हटलं की, 'माझे मित्र राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याशी खूप छान चर्चा झाली. त्यांच्या नेत्रदीपक विजयाबद्दल त्यांचं अभिनंदन, तंत्रज्ञान, संरक्षण, ऊर्जा, अंतराळ आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये भारत-अमेरिका संबंध अधिक दृढ करण्यासाठी पुन्हा एकदा एकत्र काम करण्यास आम्ही उत्सुक आहोत'

दरम्यान, एएनआयनं देखील आपल्या सुत्रांच्या हवाल्यानं मोदी आणि ट्रम्प यांच्यातील संवादाबाबत सविस्तर माहिती दिली आहे. एनआयच्या ट्विटमध्ये म्हटलं की, 'अमेरिकन निवडणुकीत विजयानंतर पंतप्रधान मोदींनी अध्यक्ष ट्रम्प यांना फोन केला. काँग्रेसच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या निर्णायक विजयाबद्दल आणि कामगिरीबद्दल पंतप्रधान मोदींनी अध्यक्ष ट्रम्प यांचं अभिनंदन केलं. दोन्ही नेत्यांनी जागतिक शांततेसाठी एकत्र काम करण्याची ग्वाही दिली.

संपूर्ण जग पंतप्रधान मोदींवर प्रेम करतं, असं या संवादावेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्म यांनी म्हटलं आहे. भारत हा एक भव्य देश आहे आणि पंतप्रधान मोदी हे एक भव्य व्यक्ती आहेत. राष्ट्राध्यक्ष ट्रम्म यांनी पंतप्रधान पान ४ वर ▶▶

## लाडक्या बहिणींच्या गर्दीत उल्हासनगरात धडाडली पंकजा मुंडेंची तोफ

### उधोगशील शहर गुंडा मुक्तीसाठी कुमार आयलानी यांच्या पाठीमागे उभे राहण्याचे लाडक्या बहिणीना आवाहन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**उल्हासनगर(प्रतिनिधी) :**

उल्हासनगर म्हणजे युएसए हे उघोगाचे माहेरघर असून लहानपणी येथील वस्तू खरेदी केल्याची आठवण पंकजा मुंडे यांनी सभेत केली. तसेच उधोगशील शहर गुंडा मुक्तीसाठी कुमार आयलानी यांच्या पाठीमागे उभे राहण्याचे आवाहन लाडक्या बहिणीना यावेळी केले.

उल्हासनगर टाऊन हॉल मध्ये गुरुवारी भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांच्या सभेचे आयोजन केले होते. हॉल मध्ये लाडक्या बहिणीने एकच गर्दी केली होती. तुम्हच्या आत्मसन्मानसाठी लाडली बहीण योजना सुरु राहणार असल्याचे मुंडे यांनी सभेत सांगितले. उल्हासनगर हे उघोगशील शहर असून




युएसए नावाने प्रसिद्ध आहे. याच शहराच्या वस्तू आमच्या घरात लहानपणी येत असल्याची आठवण त्यांनी करून दिली. मात्र शहर गुंडा मुक्त करण्यासाठी कधी पाठीमागे राहणाऱ्या कुमार आयलानी यांच्या मागे उभे राहण्याचे आवाहन केले.

सभेला कुमार आयलानी, भाजपा शहरजिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी, भाजप नेते नरेंद्र राजांनी, शिंदेसेनेचे पक्ष प्रवक्ता किरण सोनावणे, उपजिल्हाप्रमुख अरुण अशान, भाजपचे लाल पंजाबी, डॉ प्रकाश नाथानी, लाल पंजाबी यांच्यासह रिपाई व पीआरपी पक्षाचे पदाधिकारी उपस्थितीत होते.

## मतदानासाठी कर्मचाऱ्यांना पगारी सुट्टी

### नियम मोडणाऱ्यांवर होणार कारवाई

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(वृत्तसेवा) :**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. तर २३ नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. मतदानाच्या पार्श्वभूमीवर राज्यात सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या निर्णयानुसार राज्यात २० नोव्हेंबर रोजी मतदानाची सुट्टी असणार आहे. मुंबईत २० नोव्हेंबर रोजी कामगारांना पगारी सुट्टी देण्याचे आदेश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत. तसेच या आदेशाचे पालन न करणाऱ्या संस्थाविरोधात कारवाई करण्यात येणार असल्याचे आयुक्त भूषण गगराणी यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी नागरिकांना मतदान करता यावे यासाठी मुंबईत बुधवार, २० नोव्हेंबर रोजी अनिवार्य सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मुंबई जिल्हा निवडणूक अधिकारी आणि बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी पत्रक काढून ही घोषणा केली. मतदानाच्या



दिवशी सुट्टीसाठी पगार कपातीची परवानगी नसणार आहे. तसेच नियम न पाळणाऱ्या संस्थाच्या मालकांवर कारवाई केली जाणार आहे.

'सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील कंपन्या, कॉर्पोरेशन्स, उपक्रम संस्था, औद्योगिक गट, व्यापारी इतर सर्व आस्थापने यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी बुधवार २० नोव्हेंबर २०२४ रोजी कामगार, कर्मचारी आणि अधिकारी यांना रजा देणे बंधनकारक आहे,' असे महापालिकेने जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. यासोबत अपवादात्मक परिस्थितीत पूर्ण दिवसाची रजा मंजूर करणे पान ४ वर ▶▶

## केंद्रीय मंत्रिमंडळच्या निर्णयाने विद्यार्थ्यांचा होणार फायदा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**नवी दिल्ला(वृत्तसेवा) :**

आता पैशांच्या अभावामुळे कुठल्याही हुशार विद्यार्थ्याला शिक्षण अर्धवट सोडावं लागणार नाही. केंद्र सरकारने विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी इश विद्यालक्ष्मी योजना सुरू केली आहे. बुधवारी केंद्रीय कॅबिनेटमध्ये या योजनेला मंजुरी मिळाली असून या योजनेचा लाभ वर्षाला २२ लाख विद्यार्थ्यांना मिळणार



आहे. उच्च शिक्षणासाठी पैशांचा अडथळा या योजनेमुळे दूर होणार आहे. पीएम विद्यालक्ष्मी योजनेच्या माध्यमातून १० लाख रुपयांचे कर्ज सहजपणे उपलब्ध होणार आहे. सरकारी अधिसूचनेनुसार, देशातील टॉप ८६० प्रतिष्ठित उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी हे कर्ज उपलब्ध होईल. ज्यात वार्षिक २२ लाख विद्यार्थ्यांना लाभ घेता येईल. पीएम विद्यालक्ष्मी योजना देशातील त्या मुला-मुलींसाठी पुढे जाण्याचा मार्ग मोकळा करणार आहे जे आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्याने शिक्षण अर्धवट सोडून देतात. या योजनेतून कुठल्याही गॅरंटीविना शैक्षणिक कर्ज दिले जाईल. भारत सरकार ७.५० लाखांच्या कर्जाच्या रक्कमेसाठी ७५ टक्के क्रेडिट गॅरेटी प्रदान करेल ज्यातून बँकेतून विद्यार्थ्यांना कर्ज सहजपणे मिळू शकेल. या योजनेत अशा लाभार्थी विद्यार्थ्यांना १० लाख रुपयांच्या कर्जावर ३ टक्के व्याज दर असेल, ज्यांच्या कुटुंबाचं वार्षिक उत्पन्न ८ लाखांपर्यंत आहे.

पीएम विद्यालक्ष्मी योजनेत कसं मिळणार कर्ज या कर्जासाठी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण विभागाच्या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज भरावा लागेल. अर्ज प्रक्रिया सुलभ आणि पारदर्शक असेल. पात्र विद्यार्थ्यांना ७.५ लाखांच्या कर्जावर भारत सरकारकडून ७५ टक्के क्रेडिट गॅरंटी देण्यात येईल. त्याशिवाय ८ लाखापर्यंत कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या विद्यार्थ्यांना १० लाखांच्या कर्जावर ३ टक्के व्याज दर द्यावे लागेल. त्याशिवाय ४.५ लाखापर्यंत कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या विद्यार्थ्यांना व्याज दरातून सूट देण्यात आली आहे.

दरम्यान, आजच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या कॅबिनेट बैठकीत या नव्या पीएम विद्यालक्ष्मी योजनेला मान्यता देण्यात आली आहे. पीएम विद्यालक्ष्मी योजना ही राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चं आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल मानलं जाते. या धोरणात या योजनेची शिफारस करण्यात आली होती. त्यात सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्थ सहाय्य प्रदान करण्याची सूचना होती.

## बीकेसीच्या सभेनंतर राडा काँग्रेस-ठाकरेसेनेचे कार्यकर्ते भिडले



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी) :**

वांद्रे कुर्ला संकुलातील इंडिया आघाडीची सभा संपन्न झाल्यानंतर काँग्रेस आणि शिवसेनेचे कार्यकर्ते भिडल्याचे पाहायला मिळाले.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, देशाचे माजी गृहमंत्री सुशील कुमार शिंदे आणि त्यांच्या कन्या खासदार प्रणिती शिंदे त्यांच्या गाडीचे चालक आणि शिवसैनिकांमध्ये काहीशी बाचाबाची झाली. हे पाहून काँग्रेस आणि सेनेच्या कार्यकर्तेही एकमेकांच्या अंगावर धावून गेले. पोलिसांनी हस्तक्षेप केल्यावर दोन्ही बाजूकडील तणाव निवळला.

इंडिया आघाडीने विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ बीकेसी मैदानावर फोडला. या सभेला काँग्रेसचे नेते राहुल गांधी, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, मूळ राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले,राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आदी महत्त्वाचे नेते उपस्थित होते. सर्व प्रमुख नेत्यांची भाषणे आणि महाविकास आघाडीचा पंचसूत्री जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर सभेचा समारोप झाला.सभेचा समारोप झाल्यानंतर प्रमुख नेते व्हीआयपी एक्झिट गेटने बाहेर पडले. सुशीलकुमार शिंदे आणि प्रणिती शिंदे एकाच कारमधून जाणार होते. त्यांच्या गाडीच्या चालकांची शिवसैनिकांसोबत काहीशी बाचाबाची झाली. जवळपास तीन ते चार मिनिटे हे भांडण सुरू होते. उद्धव ठाकरे यांच्यासोबतच्या नेत्यांनाही गेटवर अडवले.महाविकास आघाडीच्या बीकेसीतील सभास्थळी जाताना बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलिसांनी फक्त उद्धव ठाकरेंनाच VIP गेटमधून आत सोडलं. मात्र त्यांच्या सोबत आलेल्यांना पोलिसांनी रोखलं. सहकाऱ्यांसह सुरक्षारक्षकांना आत सोडण्यास नकार दिल्यामुळे पुढे निघून गेलेले उद्धव ठाकरे माघारी आले आणि पोलिसांवर संतापले.

पान ४ वर ▶▶

## एकीकडे प्रकल्पांना विरोध अन दुसरीकडे नोकरीसाठी ओरड




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**रत्नागिरी(प्रतिनिधी) :**

मतांच्या राजकारणासाठी येणाऱ्या प्रत्येक प्रकल्पाला विरोध करायचा आणि निवडणुकीच्या काळात रोजगाराच्या नावाने ओरड करायची, अशी स्थिती कोकणात विशेषतः रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत गेली अनेक वर्षे कायम आहे.

एका पक्षाने प्रकल्प आणला की दुसऱ्याने तो घालवायचा, या प्रकारामुळे रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील स्थलांतर वर्षानुवर्षे कायम आहे.

रत्नागिरीत नुकत्याच झालेल्या प्रचार सभेत उद्धवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीचे सरकार आल्यास रोजगार देण्याचा नारा देतानाच बारसू रिफायनरी हद्दपार करण्याची घोषणाही केली.

वर्षानुवर्षे कोकण केवळ पश्चिम महाराष्ट्र आणि कर्नाटकसाठीची बाजारपेठ बनून राहिला आहे. भाजीपाला, दूध, अन्नधान्य या रोजच्या वापराच्या आणि म्हणून सर्वाधिक खपाच्या गोष्टी पश्चिम महाराष्ट्रातून कोकणात येतात. किमान पान ४ वर ▶▶




## ठाणे जिल्ह्यात १४ मतदारसंघांत होणार तिरंगी लढत

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**ठाणे(प्रतिनिधी) :**

एकीकडे ११ बंडखोर आणि त्यात ११३ अपक्ष उमेदवार डोकेदुखी ठरली असतानाच महायुती आणि महाविकास आघाडीच्या रणांगणात मनसे देखील उतरली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील १८ मतदारसंघांपैकी १४ मतदारसंघांत तिरंगी लढत होणार आहे. परिणामी प्रमुख उमेदवारांना प्रत्येक मतासाठी घाम गाळावा लागणार आहे.




ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण ३८१ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ३३४ उमेदवारांचे अर्ज वैध तर ४७ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले. वैध ठरलेल्या ३३४ उमेदवारांपैकी अजे मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ९० जणांनी माघार घेतली. त्यामुळे निवडणुकांच्या मैदानात आता २४४ उमेदवार आहेत. यामध्ये १७ विद्यमान आमदार पुन्हा एकदा आपले नशिब आजमावणार आहेत.

दुसरीकडे १८ पैकी ११ विधानसभा मतदारसंघामध्ये बंडखोरी झाली आहे. यामध्ये महायुतीत सर्वात सहा ठिकाणी तर महाविकास आघाडीत पाच ठिकाणी बंडखोरी झाली आहे. विशेष म्हणजे शिवसेना शिंदे गटाच्या विरोधात राष्ट्रवादी अजित पवार गट तर शिवसेना ठाकरे गटासमोर काँग्रेसमध्ये बंडाळी आहे. त्यामुळे वरिष्ठ पातळीवर राज्यात महायुती आणि महाविकास आघाडी असली तरी ठाण्यात वर्चस्वाच्या लढाई तीव्र झाल्याचे दिसते. यामध्ये बंडखोर आहेतच पण अपक्षांसह वंचित बहूजन आघाडी, एमआयएम, राईट टु रीकॉल पार्टी, मराठा पार्टी अशा छोट्या मोठया पक्षांचे उमेदवारही सर्व मतदारसंघात उभे आहेत. मुस्लिम, बहूजन समाजाची मते हे उमेदवार आपल्याकडे काही प्रमाणात खेचू शकतात.

**मतदारसंघनिहाय उमेदवार**

**भिवंडी ग्रामीण**

शांताराम मोरे-शिवसेना शिंदे गट
महादेव घाटाळ-शिवसेना ठाकरे गट
वनिता कथोरे- मनसे
प्रदीप हरणे-वंचित बहुजन आघाडी
विष्णू पाडवी-आरएमपीआय
अपक्ष-स्नेहा पाटील (भाजप बंडखोर), मनीषा ठाकरे

**शहापूर**

दौलत दरोडा-राष्ट्रवादी काँग्रेस
पांडूरंग बरोरा-राष्ट्रवादी शरद पवार
यशवंत वाख-बसपा
हरिश्चंद्र खंडवी-मनसे
अपक्ष-अविनाश शिंगे (शिवसेना ठाकरे गट बंडखोर), गणेश निरगुडे, गौरव राजे, रमा शेंडे उर्फ रुपाली आरज, रंजना उघडा
भिवंडी (पश्चिम): महेश चौघुले-भाजप, दयानंद चोरघे-काँग्रेस, मोबीन शेख-बसपा, अमीरुल पान ४ वर ▶▶

# महायुतीच्या विजयासाठी कामाला लागा

## माजी आमदार नरेंद्र पवार यांचे समर्थकांना आवाहन



### निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर पवारांनी साधला कार्यकर्त्यांशी जनसंवाद

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(कुणाल म्हात्रे) :**
जी यंत्रणा माझ्या निवडणुकीसाठी तयार केली होती ती यंत्रणा कल्याण डोंबिवलीतील चारही उमेदवारांच्या विजयासाठी वापरा आणि महायुतीच्या विजयासाठी कामाला लागा असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी आपल्या समर्थकांना केले आहे. नरेंद्र पवार यांनी कल्याण पश्चिम विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत दाखल केलेला अपक्ष उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर मंगळवारी कार्यकर्ते, समर्थकांशी आणि कल्याणकर नागरिकांशी जनसंवाद मेळाव्याच्या माध्यमातून संवाद साधला यावेळी ते बोलत होते.

माजी आमदार नरेंद्र पवार यांनी कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार विश्वनाथ भोईर यांच्याविरोधात दाखल केलेली उमेदवारी मागे घेतली. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नरेंद्र पवार आणि त्यांच्या समर्थकांची पवार यांच्या निवासस्थानी भेट घेत नरेंद्र पवार तसेच त्यांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपण आणि देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची जबाबदारी घेतली असल्याचे स्पष्ट केले. तर नरेंद्र पवार यांनी कल्याण मेट्रो, रिंगरोड प्रकल्प, घनकचरा प्रकल्प, मल्टी स्पेशलेटी हॉस्पिटल आणि डॉ. आंनदीबाई जोशी स्मारक प्रकल्प रखडल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सांगितले. त्यावर मुख्यमंत्री शिंदे यांनीही त्यावर सकारात्मक प्रतिसाद देत यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे आश्वासन पवार यांना दिले.दरम्यान यासर्व राजकीय घडामोडी नंतर माजी आमदार नरेंद्र पवार यांनी आपली पुढील भूमिका स्पष्ट करण्यासाठी कल्याण पश्चिमेती बालाजी गार्डन हॉल येथे जनसंवाद मेळाव्याचे आयोजन केले होते. या जनसंवाद मेळाव्याला भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच कल्याण पश्चिम विधानसभा क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक सामाजिक सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी, धार्मिक संस्थांचे कार्यकर्ते, महिला, युवक व युवती बहुसंख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना माजी आमदार पवार यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त करीत महायुतीचे उमेदवार आमदार विश्वनाथ भोईर यांना बहुमताने निवडून आणण्याचा शब्द मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला असल्याचे सांगितले. म्हायुतीच्या विजयासाठी सर्वांनी कामाला लागा असे त्यांनी स्पष्ट केले. मी भाजपा पक्षाच्या विचारांची कास कधीच सोडणार नाही, माणसाचे पद शाश्वत नसते तर पक्षनिष्ठा शाश्वत असावी लागते. मला विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी काही पक्षांच्या थेट ऑफर होत्या. मात्र मी भाजपा विचारांशी कायम एकनिष्ठ राहील त्यामुळे या गोष्टींकडे लक्ष न देता. व्यक्ती नाही तर पक्ष मोठा, या भावनेने सर्वांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार काम करा. पक्ष माझ्या व तुमच्या कार्याचा नक्कीच गौरव करेल असे उद्गार पवार यांनी काढले.

यावेळी भाजपा मोहने टिटवाळा मंडळ अध्यक्ष शक्तिवान भोईर, भाजपाचे अर्जुन म्हात्रे, निखिल चव्हाण, नितीन चौधरी, रवी दुबे, प्रिया शर्मा आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान डॉ. आंनदीबाई जोशी स्मारक प्रकल्पाबाबत नरेंद्र पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे २०२३ सालापासून पाठपुरावा करत असून या स्मारकाला राज्य सरकारने मंजूरी देखील दिली आहे. या कामासाठी १५ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. लवकरच या कामाला सुरवात होऊन काम पूर्णत्वास येणार असल्याचा विश्वास नरेंद्र पवार यांनी व्यक्त केला.

# कल्याण पश्चिमसह संपूर्ण महाराष्ट्रात महायुतीचीच सत्ता येणार



## – महायुती उमेदवार विश्वनाथ भोईर यांचा विश्वास

### प्रचार रॅलीच्या माध्यमातून टिटवाळा परिसर काढला पिंजून

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**
शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआयसह महायुतीतील प्रत्येक घटक पक्ष प्रचंड ताकदीने मेहनत करत आहोत. त्यामुळे कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण महाराष्ट्रात पुन्हा एकदा या महायुतीचीच सत्ता येणार असा ठाम विश्वास महायुतीचे उमेदवार विश्वनाथ भोईर यांनी व्यक्त केला आहे. विश्वनाथ भोईर यांनी सलग तिसऱ्या दिवशी टिटवाळा परिसरात प्रचार रॅलीच्या माध्यमातून जोरदार शक्तिप्रदर्शन केले.

टिटवाळा येथील वाजपेयी चौकापासून सुरू झालेल्या या रॅलीमध्ये महायुतीचे सर्व प्रमुख नेते, पदाधिकारी आणि शेकडो महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. येथील वाजपेयी चौक मार्गे सुरू झालेली विश्वनाथ भोईर यांची ही प्रचार रॅली टिटवाळा मुख्य मार्केट, रिजेंसी सर्वम, पटेल मार्ट, डी जी वन,स्वामी विवेकानंद चौक, धर्मवीर आनंद दिघे मार्ग, इंदिरा नगर बुद्धविहारमार्गे नांदप येथे समाप्त झाली. यावेळी उपस्थित शेकडो समर्थकांकडून विश्वनाथ भोईर आगे बढो, शिवसेना झिंदाबाद, महायुतीचा विजय असो अशा विविध घोषणांनी संपूर्ण टिटवाळा परिसर दणाणून सोडलेला पाहायला मिळाला. तर या रॅलीमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी झालेल्या लाडक्या बहिणींची लक्षणीय उपस्थिती ही विशेष आकर्षण ठरली.

गेल्या तीन दिवसांपासून आपण टिटवाळा परिसरात रॅलीच्या माध्यमातून लोकांशी संवाद साधत हा परिसर पिंजून काढला आहे. आमची प्रचार फेरी जिकडे जातेय तिकडे नागरिक आणि मतदार स्वतःहून आम्हाला हात उंचावून सकारात्मक प्रतिसाद देत आहेत याचा अर्थ ते आपल्या पाठीशी उभे असल्याचा निर्वाळा आमदार विश्वनाथ भोईर यांनी यावेळी व्यक्त केला. तर या परिसराचा अधिकाधिक विकास होण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याकडे आपण टिटवाळ्याला पर्यटन क्षेत्र घोषित करण्यासाठी पाठपुरावा केला आहे. महायुतीची पुन्हा सत्ता आणि आपण पुन्हा निवडून आल्यावर हे काम पूर्ण करू अशी ग्वाहीही विश्वनाथ भोईर यांनी यावेळी दिली.

या प्रचार रॅलीमध्ये विश्वनाथ भोईर यांच्यासह शिवसेना जिल्हाप्रमुख अरविंद मोरे, भाजपचे मंडळ अध्यक्ष शक्तिवान भोईर, संतोष तरे, अजय सावंत यांच्यासह महायुतीतील मित्रपक्षांचे सर्व प्रमुख नेतेमंडळी उपस्थित होती.

## ३० हजार गिरणी कामगारांना मिळणार
# शेलू गावात हक्काचं घर



### म्हाडा आणि खाजगी विकासाच्या माध्यमातून भव्य गृह संकुलाचे काम

### मुंबईचे गिरणी कामगार शेलू गावात विसावणार

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**
गिरणी कामगारांच्या घराचा प्रश्न आता मार्गी लागला असून ठाणे आणि रायगड जिल्ह्याच्या मध्यावर असलेल्या शेलु गावाच्या परिसरात गिरणी कामगारांसाठी भव्य संकुल उभारण्यात येत आहे. जानेवारी महिन्यात या संकुलाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाणार आहे.

१९८२ मधील तीव्र संपामुळे मुंबईतील कापड गिरण्या बंद पडल्या. त्यामुळे गिरणी कामगारांना अनेक हाल अपेष्टांचा सामना करावा लागला. महाराष्ट्र सरकारने या गिरणी कामगारांना अनुदानित घरे मिळवून देण्यासाठी खासगी विकासकांच्या भागीदारीत 'गिरणी कामगार घरकुल योजना' राबविली आहे. या योजनेअंतर्गत महाराष्ट्र सरकारच्या गृहनिर्माण विभागाने शेलू येथे जागा निश्चित केली आहे. राष्ट्रीय मिल मजदूर संघ, गिरणी कामगार संघर्ष समिती,रयतराज कामगार संघटना, महाराष्ट्र गिरणी कामगार युनियन आणि सेंच्युरी मिलकामगार एकता संघ या गिरणी कामगारांच्या प्रमुख संघटनांनी शेलू येथील 'कर्मयोगी एव्हीपी रियाल्टी' यांच्या जागेची पाहणी करून या जागेस मान्यता दिली आणि तसे पत्र म्हाडा आणि महाराष्ट्र सरकारच्या गृहनिर्माण विभागास दिले आहे.

गिरणी कामगारांच्या घरांसाठीची जागा निश्चित झाली असून आता त्या ठिकाणी प्रत्यक्ष काम लवकरच सुरू केले जाणार आहे. या गृह संकुलासाठी उल्हास नदीतून स्वतंत्र पाणीपुरवठा योजना देखील मंजूर करण्यात आली असल्याची माहिती गिरणी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रवीण घाग आणि सरचिटणीस प्रवीण येरुणकर यांनी दिली.

# नागरिकांच्या सहभागातून आधारकार्ड सेंटर येथे मतदान जनजागृती अभियान

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**ठाणे(प्रतिनिधी) :**
ठाणे शहरातील उद्योजक, कंपन्या, कारखाने, शासनाचे शासकीय, निमशासकीय कार्यालयातील मतदार, नवमतदारांमध्ये मतदानाच्या हक्काबाबत मोठ्या प्रमाणात जागृती करावी, अशा सूचना १४८ ठाणे विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी



श्रीमती उर्मिला पाटील यांनी दिल्या आहेत. त्यांच्या सूचनेनुसार ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथील आधारकार्ड केंद्र येथील कार्यरत कर्मचारी व आधारकार्ड नोंदणी करण्यासाठी आलेल्या नागरिकांसोबत मतदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

प्रत्येक मत अमूल्य आहे. कोणीही मतदानापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता येथे उपस्थित असलेल्या कर्मचारी व नागरिकांनी घेणे आवश्यक आहे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

आधारकार्ड सेंटर मध्ये नोंदणी करण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला दि.२० नोव्हेंबर २०२४ ही मतदानाची तारीख सांगून त्यांना मतदान करण्यास प्रोत्साहन द्यावे आणि सर्वांनी न चुकता २० नोव्हेंबर २०२४ रोजी अवश्य मतदान करावे, असे आवाहन उपस्थितांना करण्यात आले.

कार्यक्रमस्थळी मतदान जनजागृती अभियान संबंधित घोषवाक्याद्वारे घोषणा देण्यात आल्या व मतदारांसाठी प्रतिज्ञाचे सामूहिक वाचन घेण्यात आले.

# शिंदे गटाचे पालघर विधानसभेचे उमेदवार राजेंद्र गावीत यांच्या प्रचाराला सुरुवात



**दै.जीवनदीप वार्ता ठाणे**
**पालघर(ऋषीकेश जाधव) :**
२०२२ मध्ये शिवसेनेत फूट पडल्यानंतर राजेंद्र गावित आणि वनगा या दोघांनी उद्धव ठाकरे च्या पक्षातून शिंदे गटाकडे बाजू बदलली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी राजेंद्र गावित हे भाजपमध्ये परतले. त्यानंतर भाजपने शिंदे यांच्या नेतृत्वा खाली शिवसेनेकडून पालघर लोकसभा जागा परत मिळवली गावित यांना लोकसभेचा निवडणुकीसाठी तिकीट न मिळाल्याने गावित परत शिंदे गटाकडे परतले. तिथे त्यांना तातडीने विधानसभेचे तिकीट देण्यात आले. आणि श्रीनिवास वनगा यांना उमेदवारी पासून बाहेर करून, गावित यांना उमेदवारी देण्यात आली. पालघर विधानसभा मतदारसंघांमध्ये गावित यांचा दांडगा जनसंपर्क असल्याने त्यांना उमेदवारी देण्यात आली. अस सागन्यात येत आहे .गावित यांचा पालघर शहरात ते अगदी वाडी वस्तीमध्ये त्यांना ओळखणारा मतदार आहे. पालघर विधानसभा मतदारसंघांमध्ये सध्या, कुंदन संखे शिवसेना जिल्हाप्रमुख शिंदे गट यांचे पदाधिकारी जोमाने उतरले असल्याचे पाहायला मिळत आहे. तसेच गावित यांनी संपूर्ण मतदार संघात प्रचाराला धडाकेने सुरुवात केली असून, भाजप, राष्ट्रवादी अजित पवार गट, रिपाई आ ) असे महायुतीच्या सर्व घटक पक्षातील कार्यकर्ते गावीत यांना निवडून आणण्यासाठी व जास्तीत जास्त मताधिक्य देण्यासाठी मैदानात उतरले असल्याचे दिसत आहे. ठिक ठिकाणी गावित यांचे जंगी स्वागत होत असून, हजारो माता भगिनींचा आशीर्वाद त्यांना मिळत आहे. रोज महायुतीत नवनवीन कार्यकर्ते सामील होत असल्याने प्रचाराला वेग घेतला आहे. सर्व पदाधिकारी महिला कार्यकर्त्या प्रचारासाठी जोमाने उतरले असल्याचे पाहायला मिळत आहे. सर्व मतदार संघांमध्ये प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली असून गावित यांना भरगच्च मताने निवडून आणण्यास कार्यकर्ते जोरदार कामाला लागले आहेत.

# महाविकास आघाडीचे उमेदवार सुभाष भोईर यांची १४ गावात प्रचार रॅली



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडी तर्फे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार सुभाष भोईर यांच्या निवडणूक प्रचाराची रॅली १४ गावातून काढण्यात आली. त्यावेळी कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रभाग क्रमांक ४५ मधील प्रकाश चौधरी व प्रभाग समिती ४४ मधून व्यापारी संघटनेचे अध्यक्ष वसंत भानुशाली त्याचप्रमाणे बामर्ली गावचे परशुराम गायकर यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला त्याबद्दल त्यांचे स्वागत करण्यात आले.

१४ गावातील बाळे, वडवली, नारीवली, वाकळण, बामर्ली, निघू, नागाव या गावांमध्ये काढण्यात आलेल्या प्रचार रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी कॉंग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव संतोष केणे, कॉंग्रेस पक्षाचे कल्याण ग्रामीण अध्यक्ष चंद्रकांत पाटील, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे माजी नगरसेवक हिरा पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य रमेश पाटील, विभाग प्रमुख बाळाराम पाटील, हनुमान महाराज पाटील, वडवली गावचे अरुण पाटील, राम भोईर, माजी सरपंच परेश ठक्कर, विभाग संघटिका सपना यंदारकर, बळी पाटील, उपविभाग प्रमुख अशोक जाधव यांच्यासह सर्व शाखाप्रमुख , पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# आदर्श आचार संहितेचे पालन करावे

## - निवडणूक निरीक्षक शिल्पा शिंदे

मुंबई : विधानसभा निवडणूक शांततेत व निर्भयपणे होण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी आदर्श आचार संहितेचे पालन करावे, असे केंद्रीय निवडणूक निरीक्षक शिल्पा शिंदे यांनी सांगितले. यावेळी मुंबादेवी मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत भांडे पाटील उपस्थित होते.निवडणूक निरीक्षक शिल्पा शिंदे यांनी मुंबादेवी विधानसभा मतदारसंघातील उमेदवार व प्रतिनिधींशी या बैठकीत संवाद साधला. निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत भांडे पाटील यांनी मुंबादेवी मतदार संघातील मनुष्यबळ, ईव्हीएम, मतदान केंद्र, ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांना गृह मतदानाची सुविधा,ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांसाठी मतदान केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सोयीसुविधा, मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा आदी संदर्भातील नियोजनाबाबत माहिती त्यांनी दिली.

## आटया पाटया राज्य स्पर्धेत पुरुष गटात
# जळगाव आणि महिला गटात धाराशिव संघ विजयी



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**
महाराष्ट्र राज्य आट्या पाट्या महामंडळाच्या मान्यतेने ठाणे जिल्हा आट्या पाट्या असोसिएशनच्या माध्यमातून ३७ वी पुरुष व ३३ वी महिला सिनियर आट्या पाट्या अजिंक्यपद स्पर्धा २०२४-२५' चे ४ ते ६ नोव्हेंबर २०२४ दरम्यान भारतीय सैनिकी विद्यालय, खडवली येथे पार पडली. बक्षीस वितरण सोहळयाप्रसंगी श्री गणेश मंदिर देवस्थान डोंबिवलीचे विश्वस्त तसेच क्रीडा भारती कोकण प्रांत अध्यक्ष वैद्य विनय वेलणकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून, त्यांनी विजयी व उपविजयी संघातील खेळाडूंचे कौतुक केले. पुरुष गटात २० जिल्हे तर महिला गटात १६ जिल्ह्यातील खेळाडूंच्या स्पर्धा साखळी व बाद पद्धतीने घेण्यात आल्या. उपांत्य फेरीतील सामन्यात वाशिम विरुद्ध धाराशिव या सामन्यात (३३-२१) वाशिम संघ १२ गुणांनी विजयी होऊन अंतिम फेरीत दाखल झाला. पुरुष गटातील अंतिम सामन्यात जळगाव विरुद्ध वाशिम अंतिम सामन्यात जळगाव संघ १ गुणांनी विजयी झाला. महिलांच्या अंतिम सामन्यात धाराशिव विरुद्ध नाशिक या सामन्यात (४४-५२) धाराशिव हा संघ ८ गुणांनी विजयी झाला.







०८ नोव्हेंबर २०२४
शुक्रवार

**मेष**
काम करणाऱ्या लोकांना त्यांचा कोणताही प्रकल्प पूर्ण करण्यासाठी खूप मेहनत करावी लागेल. आज तुमच्या जोडीदाराशी कडू आणि गोड वाद होतील.

**वृषभ**
मित्र-मैत्रिणींशी मनमोकळेपणाने बोलल्यामुळे हलके वाटेल. मुलांचे लाड पुरवाल. जोडीदाराशी मतभेद टाळा. आध्यात्मिक गोष्टीत गुंतून राहा.

**मिथुन**
व्यावसायिकांसाठी दिवस चांगला आहे. तुमचे आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न कराल. तुमचे कौटुंबिक जीवन खूप आनंददायी असणार आहे.

**कर्क**
नाती अधिक घट्ट होतील.आपल्या वेळेचा योग्य वापर करू आणि प्रत्येक काम समर्पणाने करण्याची ऊर्मी असेल. तुम्हाला चांगले परिणामही मिळतील.

**सिंह**
चांगले काम केल्याबद्दल वरिष्ठांकडून शाबासकी मिळेल. आर्थिक व्यवहार चोख ठेवा. राजकीय क्षेत्रात व्यासपीठ गाजवाल. घरगुती वातावरण चांगले राहील.

**कन्या**
तुमचे ध्येय साध्य करण्यासाठी तुम्ही तयार असाल. तुमच्या वैवाहिक जीवनात सुंदर समन्वय राहील. आजचा दिवस आनंदात व्यतीत कराल.

**तूळ**
जोडीदाराचे सहकार्य मिळेल. आहाराचे पथ्यपाणी सांभाळा. व्यवसायात नको ती उलाढाल करू नका. कामाव्यतिरिक्त इतर गोष्टीत लक्ष घालू नका.

**वृश्चिक**
उपासना फलद्रूप होईल. तुमच्यामध्ये परिवर्तन घडेल. व्यवसायात देवाण-घेवाण वाढेल. नोकरदार वर्गाचे स्वप्न पूर्ण होईल. आर्थिक व्यवहार जपून करा.

**धनु**
तुम्हाला तुमच्या मुलाकडून एखादी चांगली बातमी मिळेल. लेखन इत्यादी कार्यातून तुमचा मान-सन्मान वाढेल. अधिकाऱ्यांशी सुसंवाद राखाल.

**मकर**
आर्थिक बचत करणे योग्य राहील. कुटुंबाशी एकनिष्ठ राहा. आध्यात्मिक गोष्टीत गुंतून राहा.आर्थिक जबाबदारी वेळेत पार पाडा.

**कुंभ**
अध्यापनाशी संबंधित लोकांसाठी आजचा दिवस चांगला आहे. तुम्हाला लवकरच मोठे यश मिळणार आहे. तुमचे कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**मीन**
प्रगतीच्या संधी मिळतील.कठोर परिश्रम आणि सकारात्मक वर्तनाने कठीण परिस्थितीतून बाहेर पडाल. पैशाच्या व्यवहारात थोडे सावध राहा.

# फिर एक बार 'ट्रम्प सरकार'



जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेच्या ६० व्या निवडणुकीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी चे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी अनपेक्षितपणे विजय मिळवला.

अनेपेक्षित या अर्थाने म्हणतो की या निवडणुकीत त्यांच्या प्रतिस्पर्धी डेमॉक्रटिक पक्षाच्या कमला हॅरिस यांनाही विजयाचे दावेदार समजले जात होते. या निवडणुकीत दोघांच्यातही जोरदार रस्सीखेच होती. निवडणूकपूर्व सर्वेक्षणात दोन्ही उमेदवारात काटे की टक्कर दाखवण्यात आलो होती. दोन्ही उमेदवारांची जिंकण्याची शक्यता पन्नास पन्नास टक्के व्यक्त करण्यात आली होती. जो जिंकून येईल तो अगदी काट्यावर निवडून येईल असे मानले जात होते त्यामुळेच ट्रम्प इतक्या घवघवीत मतांनी जिंकून येतील असे कोणालाही वाटले नव्हते. ट्रम्प यांनी तब्बल २७७ इलेक्ट्रोल मत मिळवत कमला हॅरिस यांचा दारुण पराभव करत अमेरिकेत फिर एक बार 'ट्रम्प सरकार' आणले. फिर एक बार असे मी म्हणालो कारण २०१६ ते २०२० असे चार वर्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे सरकार अमेरिकेत होते. २०२० साली म्हणजे मागील निवडणुकीत त्यांचा ज्यो बायडेन यांनी दारुण पराभव केला होता. यावेळी मात्र त्यांनी त्या पराभवाचे पुरेपूर उट्टे काढले आणि अमेरिकेवर पुन्हा एकदा स्वतःचे वर्चस्व सिद्ध केले. अर्थात त्यांचा हा विजय का झाला हे देखील तपासून पहावा लागेल. डोनाल्ड ट्रम्प यांनी आक्रमक प्रचार करताना अमेरिका फर्स्ट या धोरणाचे जोरदार समर्थन केले. डोनाल्ड ट्रम्प हे कट्टर उजव्या विचारसणीचे आहेत त्यांनी आपल्या प्रचारात हा मुद्दा जोरदारपणे मांडला.

आपल्या देशातील समस्यांना अन्य देशातून आलेले स्थलांतरित जबाबदार आहेत. ज्यो बायडेन यांच्या काळात अन्य देशातून अनेक लोक अमेरिकेत आले त्यामुळे अमेरिकेतील स्थानिक नागरिकांचा रोजगार हिरावला गेला असा जोरकस प्रचार त्यांनी केला त्यांचा हाच प्रचार त्यांच्या पथ्यावर पडला आणि तरुणांनी त्यांना भरभरून मते दिली. त्यांनी केलेला आयातीला विरोध आणि आयात उत्पादनावर कर वाढवण्याची केलेली घोषणा ही मतदारांना पटली. अमेरिकने अन्य देशांच्या भांडणात पडण्याची गरज नाही हे त्यांचे मतही जनतेला पटले.

तसेच त्यांचा चीन आणि रशियाला असलेला विरोध जगजाहीर आहे. अमेरिकेला मागे सारून चीन जागतिक महासत्ता होऊ पाहत आहे आणि त्यांना रशिया सहाय्य करत असताना ज्यो बायडेन हातावर हात ठेवून बसले आहेत असे चित्र गेली चार वर्ष दिसत होते. चीन आणि रशियाच्या वाढत्या वर्चस्वाला शह द्यायचा असेल तर डोनाल्ड ट्रम्प सारखा आक्रमक नेताच देशाचा राष्ट्राध्यक्ष हवा असे मत अमेरिकन नागरिकांचे बनले त्यात रशिया - युक्रेन आणि इस्राईल - पॅलेस्टाईन युद्धात बायडेन यांनी स्वीकारलेले बोटचेपे धोरण मतदारांना रुचले नाही म्हणूनच अमेरिकन मतदारांनी पुन्हा एकदा ट्रम्प यांच्या हाती सत्ता दिली आणि कमला हॅरिस यांना नाकारले. कमला हॅरिस यांनी ट्रम्प यांना जोरदार टक्कर देण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांना प्रचारासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही ज्यो बायडेन यांनी खूप उशिरा त्यांची उमेदवारी घोषित केली त्यामुळे त्यांना प्रचारासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही. कमला हॅरिस यांचा पराभव हा ज्यो बायडेन यांच्यामुळेच झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण ज्यो बायडेन यांची चार वर्षाची कारकीर्द निराशाजनक अशीच होती. अमेरिकेतील सर्वात निष्क्रिय राष्ट्राध्यक्ष अशी अमेरिकेच्या इतिहासात त्यांची नोंद होईल इतकी निराशाजनक कामगिरी त्यांची होती. महागाई, बेरोजगारी, शस्त्र संस्कृती याबाबत त्यांनी दिलेले एकही आश्वासन त्यांना पूर्ण करता आले नाही. बेकायदेशीर स्थलांतरितांचा प्रश्न त्यांना व्यवस्थित हाताळता आला नाही त्यामुळे तरुणांमध्ये त्यांच्या विषयी रोष होता तो त्यांनी मतपेटीतून व्यक्त केला. सगळ्यात महत्वाचे म्हणजे २१ व्या शतकातही अमेरिकेन नागरिक एका कृष्णवर्णीय महिलेला राष्ट्राध्यक्ष म्हणून स्वीकारण्यास तयार नाही या आणि यासारख्या अनेक कारणांमुळे डोनाल्ड ट्रम्प यांचा विजय सोपा झाला आणि ते पुन्हा एकदा फिर एक बार 'ट्रम्प सरकार' म्हणत सत्तेवर आले.

- श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात दि.०६ नोव्हेंबर पासून दररोज रक्तदान शिबिराचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**

ठाणे, मुंबई शहरामध्ये गरजू रुग्णांना रक्ताचा तुटवडा भासत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने गुरुवार, दि.६ नोव्हेंबर २०२४ पासून रक्तपेढी विभाग (ब्लड बँक),सिव्हिल रूग्णालय ठाणे, प्रादेशिक मनोरुग्णालयाजवळ, ठाणे येथे रक्तदान शिबिराचे दररोज आयोजन करण्यात येणार आहे. तरी इच्छुक रक्तदात्यांनी, स्वयंसेवी संस्थांनी, महाविद्यालयीन तरूण-तरूणींनी स्वेच्छेने रक्तदान करण्यास पुढाकार घ्यावा आणि गरजू रुग्णांना मदत करावी व रक्तदान करून या सामाजिक व राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार यांनी केले आहे.

## कल्याण ग्रामीण मतदारसंघात महायुतीच्या राजेश मोरे यांच्या प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील शिवसेना भाजप राष्ट्रवादी, रिपाइं महायुतीचे उमेदवार राजेश मोरे यांच्या निवडणूक प्रचाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना दिसत आहे. कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघामध्ये मोरे यांनी गेल्या दोन दिवसांपासून मतदारांच्या वैयक्तीक गाठीभेटीवर भर देण्यात येत असून मतदार पुन्हा एकदा महायुतीच्या सरकारलाच पसंती देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

उमेदवारी जाहीर झाल्यापासून कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार राजेश मोरे यांनी मतदारसंघ पिंजून काढायला सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज मतदारसंघातील रेल्वे समांतर रस्ता कचोरे गाव येथील गावदेवीचे दर्शन घेत आपल्या निवडणूक प्रचाराला सुरुवात केली. वाजत गाजत निघालेल्या या पदयात्रेच्या माध्यमातून या भागातील कशिष गेलेक्सी, पारिजात, हनुमान मंदिर, श्रीकृष्ण नगर, नगरसेविका रेखा चौधरी यांचे जनसंपर्क कार्यालय, लोकग्राम, चक्कीनाका, नगरसेवक मोरेश्वर भोईर यांचे कार्यालय करून पुढे भाल गाव येथील गणेश म्हात्रे यांच्या घराजवळ या पदयात्रेचा समारोप करण्यात आला.राज्यात असणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचे महायुतीचे सरकार अत्यंत वेगाने प्रगती करत आहे. आमच्या सरकारने राज्यातील विद्यार्थी, महिला, युवक, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक यांच्यासह गोरगरीब जनतेसाठी अनेक लोककल्याणकारी योजना राबवल्या आहेत. त्यामुळे जनता पुन्हा एकदा महायुतीच्या सरकारला निवडून देईल असा विश्वास राजेश मोरे यांनी यावेळी व्यक्त केला.

या प्रचारावेळी महायुती उमेदवार राजेश मोरे यांच्यासह मनोज चौधरी, कविता गावंड, प्रमिला चौधरी, किरण मोंडकर, रश्मी गव्हाणे, राजन चौधरी आणि अनेक पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १० नोव्हेंबरला 'शास्त्रीय उपशास्त्रीय गायनामधील तबला संगत' पुस्तकाचे प्रकाशन

दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :

येत्या रविवारी दि. १० रोजी नवी मुंबईतील तबला वादक संदेश राजे यांनी लिहीलेल्या 'शास्त्रीय उपशास्त्रीय गायनामधील तबला संगत' पुस्तकाचे प्रकाशन वाशीमधील विष्णुदास भावे नाट्यगृहात सकाळी १०. ३० वाजता एका विशेष कार्यक्रमात केले जाणार आहे. याप्रसंगी प्रख्यात तबला वादक पं. नाना मुळे, उषा गायतोंडे, गान विदुषी डॉ. संध्या काथवटे, प्रख्यात हार्मोनियम वादक डॉ. दिलिप गायतोंडे, सुप्रसिध्द तबला वादक कौशिक बासू, गायक पं.रघुनाथ फडके, नवी मुंबई महापालिकेचे माजी शिक्षण मंडळ सभापती एकनाथ पाटील, पत्रकार राजेंद्र घरत आदि मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यावेळी तबला सोलो संदेश राजे सादर करणार असून त्यांना नगमा संगत विनोद पडगे करणार आहेत. तर कळवा बेलापूर गायक वादक मंडळाच्या कलाकारांकडूनही यानिमित्त अभंगवाणी सादर केली जाणार आहे.

# अंमली पदार्थाची अवैध वाहतूक

## आरोपींवर पालघर पोलीसांकडून कारवाई

दै.जीवनदीप वार्ता ठाणे पालघर(ऋषीकेश जाधव) :

आगामी विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून संपुर्ण महाराष्ट्रात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांना पालघर जिल्हयात चालणारे अवैध धंदे, विनापरवाना अग्नीशस्त्र बाळगणारे इसम यांचेविरूध्द कारवाई करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.दि ०५. २०२४ रोजी विकास नाईक, उप विभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग यांना गुप्त बातमीदारामार्फत अंमली पदार्थाची वाहतूक होणार असलेबाबतची गोपणीय माहिती प्राप्त झाली. त्याअनुषंगाने विकास नाईक, उप विभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग यांनी त्यांचेकडील स्ट्रायकिंग फोर्सचे अंमलदार सहा. फौज/म्हसकर, चंद्रकांत केंद्रे, गोरखनाथ वाघ, गोरखनाथ चव्हाण, अजय मोरे, यांच्यासह दुपारी १३.०० वाजेपासून बोईसर पोलीस ठाणे हद्दितील खैराफाटक कोस्टल चेक पोस्ट येथे नाकाबंदी लावून वाहने तपासत असताना एक संशयीत



मारुती सुझुकी कंपनीची इको चारचाकी वाहन क्र.एम.एच.४८. बी.एच.१४३९ ही त्या ठिकाणी आली. सदरचे इको वाहानामध्ये दोन इसम 'मेथ्याक्यालोन' (Methaqualone) पांढरे रंगाचा उग्रवासाची पावडर अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी जवळ बाळगुन वाहनातून प्रवास करत असताना मिळुन आले.त्यांची नावे संग्रामसिंह राजदेवसिंह राजपुत, वय ४२ वर्षे, रा. जुनाठपाडा, संजान ता. जि. वलसाड, गुजरात २) नितेश महेश अग्रवाल, वय ३९ वर्षे, रा. नरहरीसदन, फ्लॅट न १९,२५ एसव्ही स्ता सिटीसेंटर, गोरेगाव पश्चिम, मुंबई अशी असून त्यांचेकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

१) ४,००,०००/- रूपये मेथ्याक्वालोन अंमली पदार्थाची पांढरे रंगाची उग्रवासाची पावडर एका डबल प्लॅस्टीक कॅरीबॅगमध्ये मिळून तिचे वजन ४० ग्रॅम असून प्रतिग्रॅम दहा हजार बाजार मुल्य असलेली. १५,०००/ रूपये समसंग कंपनीचा काळेरंगाचा मोबाईल हॅण्डसेट जुना.२०,०००/- रियलमी कंपनीचा गोल्डन रंगाचा मोबाईल हॅण्डसेट जुना .काचेचे चंचुपात्र नळी जुनी .

डिजीटल वजनकाटा कोव्हिओ कपंनीचा जुना .; ६,००,०००/रुपये मारूती सुझुकी कंपनीची इको चारचाकी वाहन एम एच ४८ बी एच १४३९ असा नंबर असून पांढरे रंगाची जुनी.

२०,०००/रूपये पॉकेट एक त्यामध्ये संग्रामसिंह राजपूत याचे आधारकार्ड पॅनकार्ड, एटीएम, घडयाळ, दोन मोबाईल हॅण्डसेट एक इनटेक्स कंपनीचा व इनफिनिक्स कंपनीचा छोटया प्लॅस्टीक कॅरीबॅग, रोख ५५०/रूपये, कापडीमास्क, गाडीच्या चाव्या.१५००/रूपये एक मनगटी घड्याळ सिल्वर रंगाचे टॅ गहयुअर कंपनीचे.१०,०००/रूपये एक मोबाईल मोटोरोला कंपनीचा ऑलीव्ह ग्रीन रंगाचा.

३०,८४०/रूपये रोख रक्कम त्यामध्ये ५०० रूपये दराच्या २१ नोटा, २०० रूपये दराच्या असा एकूण १०,९७,३४०/- रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

वरील दोनही आरोपींना अटक करून त्यांचेविरूध्द बोईसर पोलीस ठाणे येथे ॥ ५०३/२०२४ गुंगीकारक औषधीद्रव्य व मनोव्यापारावर परीनाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ (NDPS) कलम ८ (क), २१, २२, २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्ह्यातील जप्त अंमली पदार्थ हा वरील नमुद आरोपीत यांनी पाहिजे आरोपी मोहम्मद सल मानअली रफाई, रा. वलसाड, गुजरात याचेकडून विक्रीकरीता आणल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास हा पोउपनि/मुंडे, नेमणुक बोईसर पोलीस ठाणे हे करत आहेत. सदरची कामगिरी ही बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पाल घर, विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शना खाली विकास नाईक, उप विभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग व स्ट्रायकिंग फोर्सचे अंमलदार सहा. फौज/म्हसकर, पोअं/४२२ चंद्रकांत केंद्रे, पोना/७९१ गोरखनाथ वाघ, पोअं/९५३ गोरखनाथ चव्हाण, पोअं/२५७ अजय मोरे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

## पेण विधानसभा निवडणूकीत रवि पाटील यांना टक्कर देण्यासाठी अतुल म्हात्रे व प्रसाद भोईर मैदानात

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी) :**

पेण सुधागड रोहा मतदार संघाची निवडणूक अतीतटीची होणार असल्याने या निवडणुकीत दोन नवखे उमेदवार असून राजकारणात मुरब्बी असलेले रवि पाटील पुन्हा मैदानात उतरले आहेत त्यामुळे पेणकरांनी दिवाळीचे फटाके फोडायला सुरुवात केली आहे.

एकीकडे आघाडीत बिघाडी झाल्याचे चित्र समोर पहावयास मिळते. १९१ - पेण विधानसभा मतदार संघामध्ये रवींद्र दगडू पाटील (भाजपा), देवेन मारुती कोळी (वंचित बहुजन आघाडी) प्रसाद केळुराम भोईर (शिवसेना, उबाठा), विश्वास मधुकर बागुल (अपक्ष), अतुल नंदकुमार म्हात्रे (शेकाप), मंगल परशुराम पाटील (अभिनव भारत पार्टी), अनुजा उर्फ अनु केशव साळवी (बहुजन समाज पार्टी), असे उमेदवार असल्याने चुरस वाढली आहे.यामध्ये महाविकास आघाडी मध्ये अतुल म्हात्रे यांनी शेकाप मधून तर प्रसाद भोईर यांनी उबाठागट शिवसेने मधून उमेदवारी अर्ज दाखल केला असल्याने आघाडीत बिघाडी झाली असून दोघेही मीच महाविकास आघाडीचा उमेदवार असे सांगतात मात्र नक्की कोण आहे हे सामान्य जनता व मतदारांना पडलेला प्रश्न आहे. तर रविंद्र पाटील यांनी भाजपातून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. .परिणामी मते विभागली जाणार असल्याचे दिसून येते.

खारेपाट विभागातील प्रत्येक निवडणूक पाणी प्रश्नावर लढली जाते. खारेपाट विभागात यावेळी विविध प्रश्न ऐरणीवर आले आहेत.सेझ जमिनीचा गुंता,समुद्र काठ बांधिस्थी ,गेल पाइप लाइन,नैना,तिसरी महामुंबई,अलिबाग विरार कॉरिडॉर या संमिश्र प्रश्नावर संमिश्र मते.यामुळे कोठे मते जातील याचा विचार करता येत नाही.यातच पाण्यासाठी झालेले मोठे आंदोलन लोकांचा मिळालेला प्रतिसाद, त्यामधील नाराजीचा सूर ,याचा परिणाम मतांवर होण्याची शक्यता राहील.. काम करणारा नेता म्हणून आंदोलनातून खासदार सुनील तटकरे यांनी लोकांना दिलेला शब्द पाळला म्हणून खारेपाट विभागात त्यांना लोकसभेत मतदान वाढले. एकंदरीत लोकांची अपेक्षा पूर्ण झाली पाहिजे ही माफक अपेक्षा.

मागील२०१९ विधानसभेत रवीशेठ पाटील यांना १ लाख चार हजार मते मिळाली.तसेच आमदारकीचे शेकाप उमेदवार विद्यमान भाजपा खासदार धैर्यशील पाटील यांना ७९ हजार मते मिळाली यामुळे मोठ्या फरकाने त्यांचा पराभव झाला त्याचे एकमेव कारण पाणी प्रश्न हाच राहिला कारण लोकांची उग्र भावना दिसत होती. यावेळी सुध्दा खारेपाट विभागात पाण्याचा मुद्दा कारण ठरू शकतो का हे पहावे लागेल.

आत्ता बलाढ्य रवी पाटील यांचा कामाचा मोठा अनुभव,काम करण्याची पद्धत,निधी मोठ्याप्रमाणावर आणून विकास कामावर लक्ष दिले आहे.त्यातच खासदार धैर्यशील पाटील यांची साथ आहे, त्यामुळे खारेपाट विभागातील मतदार मोठा आहेच.शिवाय जुने काँग्रेस पाटील साहेबांना मानतात त्यामुळे भाजपा वाढलेला दिसतो. खासदार सुनील तटकरे यांची राष्ट्रवादी,शिंदे साहेबांची शिवसेना यांचे पाठबळ असल्याने रविशेठ पाटील यांना टक्कर देण्यासाठी अतुल म्हात्रे आर्किटेक्ट,उच्च शिक्षित यांना शेतकरी कामगार पक्षाचे पाठबळ आहेच.शिवाय त्यांनी मागील काही महिन्यात mmrda चे विषय घेऊन गावोगाव बैठका घेतल्या, लोकांपर्यंत पोहचण्यात यश मिळविले आहे. नवी मुंबई पनवेल येथे नैना विरोधी भूमिका घेऊन विकासच्या मुद्यावर सरकार दरबारी छाप पाडली आहे. बरेच अधिकारी वर्ग,मंत्री,आमदार ,या बरोबर सलोख्याचे संबंध आहेत.त्यांच्या कामाची छाप दिसून तेथे.मात्र हमरापुर विभागातून दोन उमेदवार असल्याने काय बदल होते हे पाहण्यासारखे आहे.शिवाय खारेपाट विभागात त्यांची आजोळ आहे.त्यामुळे त्यांना किती मतदान होईल हे येणारा काळच ठरवेल. तिसरे उमेदवार शिवसेना उबाठा गटाचे प्रसाद भोईर हे पण उच्च शिक्षित आहेत.प्रशासनाचा चांगला अनुभव आहे.त्यांचे खेड्यापाड्यातील संपर्क आदिवासी बांधव,यांच्यासाठी ते सतत कार्य करत असतात, त्यांनी पूरग्रस्तांसाठी फार छान काम केले आहे.त्यांच्या सततच्या दौऱ्यात काम दिसून येथे.काही ठिकाणी स्वखर्चाने काही कामे केली आहेत.जमेची बाब म्हणजे उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेची मोठी साथ त्यांना मिळाली आहे.मशाल चिन्हावर ते निवडणूक लढविणार आहेत. मात्र खारेपाट विभागात त्यांचा प्रभाव कसा पडतो लोक कशाप्रकारे मतदान करतील यावर अवलंबून राहील.दोन नवखे उमेदवार. दोघानाही दोन मोठ्या पक्षांचे पाठबळ आहे. नव्याने मतदार बंधू पर्यंत पोहचून हे नवखे उमेदवार तुमच्यासाठी काय करू शकतात हे पाहणे खारेपाट विभागातील जनतेला सांगावे लागेल.सर्वात सिनियर आमदार माजी मंत्री रवीशेठ पाटील यांना टक्कर द्यावी लागेल हे दिव्यच म्हणावे लागेल.आता तिरंगी चुरस दिसून येईल यात तिळमात्र शंका नाही.

## रविवारी 'डोंबिवलीकर किलबिल' महोत्सवाचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

डोंबिवलीकर बाल दोस्तांच्या आवडीचा किलबिल फेस्टिवल डोंबिवलीकर किलबिल फेस्टिवल रविवार, दि १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ ते १० वाजेपर्यंत डोंबिवली पश्चिमेतील बावन चाळ परिसरातील रेल्वे मैदानावर आयोजित करण्यात येणार असल्याचे डोंबिवलीकर प्रतिष्ठानच्या वतीने सांगण्यात आले.डोंबिवलीच्या सांस्कृतिक कार्यक्रमांच्या वर्दळीत डोंबिवलीकर किलबिल फेस्टिवल म्हणजे बाळगोपाळांसाठी हक्काचा असतो. लहान मुलांना खेळा-शिका-स्वतः बनवा या संकल्पनेवर आधारित या धमाल कार्यक्रमाचे यंदाचे १२ वे वर्ष आहे. मौज मजा धमाल मस्तीचा अविस्मरणीय उत्सव त्यात धाडसी खेळांचे साहस रंगत आणतात. केवळ लहान मुलांच्या मनोरंजनासाठी बारा वर्षांपूर्वी डोंबिवलीकर किलबिल फेस्टिवलची संकल्पना सुरू केली. मुलांना चित्रकला, टॅटू, कॅरिकेचर यासोबत कुंभाराच्या चाकावर मातीची भांडी, वायरची खेळणी स्वतः बनवता येणार आहेत तसेच बोलक्या बाहुल्या, मोझॅक आर्ट, जम्पिंग मून वॉक, बालनाट्य, जादूचे प्रयोग यासारखे कार्यक्रम ही पाहायला मिळणार आहेत.

यंदा थाऊसंड हँड डान्स ग्रुप आणि झिरो डिग्री डान्स, हा अद्भुत नृत्य प्रकार बाळगोपाळांना आकर्षित करतील. जायंट पांडा, टेडी बेअर, हेडलेस मॅन, अल्लाउद्दीनचा जिन असे विविध बहुरूपी छोट्या दोस्तांच्या चेहेऱ्यावर हास्य खुलवतील. तर साहसी खेळांमध्ये कमांडो ब्रिज, रिव्हर क्रॉसिंग, वॉल क्लायंबिंग असे थरारक प्रकार अनुभवायला मिळणार आहेत. यंदा दोन सेगवे व्हेइकल्सचा थरार पण मुलांना अनुभवायला मिळणार आहे. तांदुळावर नाव कोरणे, मेंदी, लाखेच्या बांगड्या बनवून मिळणार आहेत. विशेष म्हणजे सर्व खेळ आणि सुविधा डोंबिवलीकर बाळ गोपाळांसाठी मोफत आहेत.

## दिवाळी संपली तरी आनंदाच्या शिधा पासून नागरिक वंचित

दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ नुसार अंत्योदय व अन्न योजना, प्राधान्य कुटुंब एपीएल (केशरी) शिधापत्रिका धारकांना ईपॉस प्रणालीद्वारे १ किलो रवा, १ किलो साखर, १ लिटर पामतेल, १ किलो चनाडाळ या ४ शिधाजिन्नस समावेश असलेल्या विशेष शिधाजिन्नस संच प्रती संच १०० रु. मात्र राज्यतील, १ कोटी ६१ लाख लाभार्थ्यांना वाटप करण्याची योजना राज्य शासनाने सुरु केली आहे. त्यानुसार दिवाळी सणानिमित्त, गौरी गणपती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, राम मंदिर प्राणप्रतिष्ठा दिवस अशा सणांमध्ये गरीबांना त्याची दिवाळी गोड होण्यासाठी १०० रु. मध्ये ४ शिधाजिन्नस वाटप करण्यात येते. परंतू अद्याप दिवाळी संपून गेली तरी कल्याण शिधावाटप कार्यालय क्षेत्रात अद्याप शिधाजिन्नस मिळाले नाहीत. ऐन सणासुदीच्या काळात नागरीकांना आनंदाचा शिधा पासून वंचीत रहावे लागले आहे. 'कुठे आहे आनंदाचा शिधा' असा नागरीकाचा आक्रोश आहे. तरी आपण योग्य ती कार्यवाही करुन आनंदाचा शिधा त्वरीत मिळवून देण्याची मागणी रेशनिंग कृती समिती कल्याणचे माजी विरोधी पक्ष सदस्य राम बनसोडे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी ३८ फ कल्याण शिधावाटप कार्यालयाचे शिधावाटप अधिकारी यांना पत्र दिले आहे.

## वाहन तपासणी दरम्यान वाहनातून सहा लाखांची रक्कम जप्त

मुंबई : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर तपासणी दरम्यान गोरेगाव विधानसभा मतदारसंघातील आचारसंहितेच्या भरारी पथक क्रमांक ८ ने १६३-गोरेगाव येथे वाहन तपासणी केली. या तपासणीदरम्यान, जैन मंदिराजवळील एस. व्ही. रोडवर एका वाहनामध्ये ६ लाख ११ हजार ८२० रुपये रोख रक्कम सापडली. आचारसंहितेच्या कालावधीमध्ये विहित रकमेपेक्षा अधिक रोख रक्कम बाळगल्याबद्दल गोरेगाव पोलिस ठाण्यात रीतसर पंचनामा करून या नोटांच्या तपशीलासह जप्त रक्कम जमा करण्यात आली आहे. यासंदर्भात भरारी पथकातील अधिकारी पुढील कार्यवाही करत आहेत.

## मुरबाडमध्ये भात कापणी अंतिम टप्प्यात

### परतीच्या पावसामुळे शेतात भाताची रोपे जागेवरच कुजून पडल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान!

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुरबाड(दिलीप पवार) :**

मुरबाड तालुक्यात ग्रामीण व आदिवासी पट्ट्यात परतीच्या पावसामुळे सर्वत्र उशिरा भातकापणीला सुरुवात झाली आहे. परंतु गेल्या आठवड्यापासून भात कापणीला जोमाने सुरू झाल्याने सर्वत्र भात हंगामीचा कामे सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे. तर



काही ठिकाणी भात कापणी अंतिम टप्प्याआहे.तर काही ठिकाणी भात कापणी जोमाने सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.

तर शेतामध्ये परतीच्या पावसामुळे बहुतांशी शेतात भाताचे रोपे कुजून पडली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसान भरपाईच्या प्रतिक्षेत शेतकरी वर्ग आहे परंतु ऐन विधानसभेच्या निवडणुकीमध्ये सरकारी यंत्रणा कामाला लागली आहे. त्यामुळे भरपाई कधी मिळणार शेतकरीवर्गांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

## विजयानंतर ट्रम्प आणि...

पान १ वरून >>

मोदींना सांगितले की, ते त्यांना आणि भारताला खरे मित्र मानतात. ट्रम्प यांनी पुढे असंही म्हटलं की, आपल्या विजयानंतर अभिनंदनासाठी सर्वात आधी मला पंतप्रधान नरेंद्र मोदींचा फोन आला.

## मतदानासाठी कर्मचाऱ्यांना...

पान १ वरून >>

शक्य नसेल, तर कर्मचाऱ्यांना किमान चार तासांची सूट दिली जाऊ शकणार आहे. मात्र त्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. दरम्यान, भारतीय निवडणूक आयोगाने मुंबईतील पात्र मतदारांना बाहेर पडण्यासाठी आणि मतदान करण्यासाठी आणि मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. शहरी मतदारांच्या उदासीनतेबद्दल आयोगाने चिंता व्यक्त केली होती. त्यामुळे आता निवडणूक असलेल्या मतदान क्षेत्रामध्ये कोणताही व्यवसाय, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर कोणत्याही आस्थापनेमध्ये असलेल्या आणि राज्य विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला या दिवशी सुट्टी दिली जाणार आहे. तसेच या रजेच्या बदल्यात संबंधित व्यक्तीच्या पगारात कोणत्याही प्रकारची कपात करण्याची परवानगी नसणार आहे. कोणत्याही संस्थेने या नियमांचे किंवा तरतुदींचे उल्लंघन केल्यास निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार कारवाई केली जाईल. कलम १३५ (ब) नुसार लोकप्रतिनिधी कायदा-१९५१ नुसार निवडणूक आयोगाच्या नियमाचे पालन न केल्यास मालकावर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे आयुक्त भूषण गगराणी यांनी म्हटलं आहे.

## बीकेसीच्या सभेनंतर राडा ..

पान १ वरून >>

'आधी सगळयांना आत घ्या, कोण आहे तो? त्याचं नाव घ्या' असं म्हणत उद्धव ठाकरेंनी पोलिसांना जाब विचारला. त्यानंतर पोलिसांनी आदित्य ठाकरे आणि इतर सुरक्षारक्षकांना VIP गेटमधून आत सोडलं.

## एकीकडे प्रकल्पांना विरोध...

पान १ वरून >>

भाजीपाला आणि दूध यासाठी कोकण स्वयंपूर्ण करण्यावर कोणत्याही राजकीय पक्षाने कधीही भर दिलेला नाही. त्यामुळेच वर्षानुवर्षे पोटापाण्यासाठी कोकणी लोकांनी मुंबई गाठली. आता लोक केवळ नोकरीसाठी बाहेर पडत नाहीत तर त्याआधी उच्च शिक्षणासाठीच बाहेर पडतात. उच्च शिक्षण घेतल्यानंतर त्यांना रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत नोकऱ्या उपलब्ध नाहीत. म्हणून ते कायमच जिल्ह्याबाहेर राहतात. दरवेळी निवडणुका आल्यानंतर तरुणांच्या हाताला काम, रोजगार, प्रकल्प, पर्यटनातून विकास अशा गोष्टींवर उहापोह केला जातो. आम्ही अमुक करू, तमुक करू म्हणून घोषणा केल्या जातात. मात्र, वर्षानुवर्षे यात काहीच फरक पडलेला नाही. कोकण आहे तसाच राहिला आहे. कोकणाबाहेर राहणारे लोक कोकण असाच निसर्गसंपन्न राहू दे म्हणून इथल्या प्रकल्पांना विरोध करतात. पण प्रत्यक्षात कोकणातून कामासाठी बाहेर जाणाऱ्या तरुणांचा विचारच केला जात नाही.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::
९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१
- E Mail -
jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com

# महाराष्ट्राला बळ देणारा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा जाहीरनामा

**- प्रमोद हिंदुराव**



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने आपला स्वतंत्र जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. या जाहीरनाम्यात अनेक घोषणा करण्यात आल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव यांनी कल्याणमध्ये आयोजित पत्रकार परिषदेच्या माध्यमातून या जाहीरनाम्यातील प्रमुख बाबींची माहिती माध्यमांना दिली.

या जाहीरनाम्यात लाडकी बहिण योजने अंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणारी रक्कम १५०० रुपयांवरून २१०० रुपये करण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. महिला सुरक्षेसाठी पोलीस दलात २५ हजार महिलांची भरती, वीज बिलात ३० टक्के कपात करून सौर उर्जेला प्राधान्य देणे, त्याचबरोबर राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर १०० दिवसांच्या आत नव महाराष्ट्र दृष्टीकोन स्थापन करणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात म्हटले आहे. लोकांच्या हिताचे निर्णय घेण्याचे काम महायुतीच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी करत असल्याचं यावेळी प्रमोद हिंदुराव म्हणाले.

कल्याण पश्चिम विधानसभा मतदार संघात भाजपचे शहर अध्यक्ष वरुण पाटील यांनी केलेल्या बंडखोरीवर भाष्य करताना प्रमोद हिंदुराव यांनी म्हटलं की बंडखोरीला कोणी थारा देत नसून पक्ष महत्त्वाचा असतो. महायुतीचे प्रत्येक उमेदवार निवडून येतील असा विश्वासही हिंदुराव यांनी आयोजित पत्रकार परिषदेतून व्यक्त केला.

# दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांसाठी 'सक्षम ॲप' ठरणार वरदान

आगामी विधानसभा निवडणुकीत दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांना सुलभतेने मतदान करता यावे यासाठी निवडणूक आयोगाने 'सक्षम' नावाचे मोबाईल ॲप तयार केले आहे.

या ॲपवर दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या सुविधेचा सर्व गरजू मतदारांना आपल्या मोबाईलमध्ये 'सक्षम ECI' ॲप डाऊनलोड करून लाभ घेता येणार आहे. दिव्यांग (PWDs) मतदारांकरिता आयोगाने तयार केलेल्या सक्षम ॲपवर विविध सुविधा दिल्या आहेत. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी सर्वप्रथम दिव्यांग मतदारांनी आपल्या मोबाईलमध्ये सक्षम ॲप डाऊनलोड करून घ्यावे.

निवडणूक संदर्भात सेवा घेण्याकरिता दिव्यांग व वयोवृद्ध मतदारांनी त्यांचे नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक इ. माहिती ॲपमध्ये भरावी. दिव्यांग व वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांना या सक्षम ॲपद्वारे मतदानाच्या दिवशी मतदानासाठी लागणाऱ्या सहाय्यतेची मागणी नोंदविता येईल, त्याद्वारे मतदारसंघातील दिव्यांग आणि वयोवृद्ध मतदारांना त्यांच्या मतदानाचे मतदारसंघ व स्थान निश्चिती यंत्रणेला करणे शक्य होईल. या ॲपद्वारे नोंदणी झाल्यानंतर दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी वाहतूक व्यवस्था, व्हीलचेअर, सहाय्यक, मदतनीस इ. प्रकारची सुविधा या ॲपच्या माध्यमातून मिळणार आहेत. सक्षम ॲपमध्ये अनेक सुविधा प्रदान करण्यात आल्या आहेत.

या ॲपमध्ये मोठे फॉन्ट आणि उच्च कॉन्ट्रास्ट रंग असल्यामुळे दिव्यांगासाठी वापर करणे सोपे होईल. यामध्ये मतदान केंद्राबद्दल माहिती उपलब्ध असून ज्यामध्ये आपले मतदान केंद्राचे स्थान, मतदान केंद्र, उपलब्ध प्रवेश योग्यता आणि अधिकारी संपर्क या तपशिलाचा समावेश आहे. दिव्यांगांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होताना येणाऱ्या कोणत्याही समस्येबद्दल ॲपवर तक्रार नोंदविता येणार आहे.दिव्यांगांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी सक्षम ॲप हे महत्वाचे असून हे ॲप वापरण्यास अतिशय सोपे आहे. ज्यामुळे दिव्यांगांना व ज्येष्ठ नागरिकांना मतदान करण्यासाठी नोंदणी करणे, त्याचे मतदान केंद्र शोधणे आणि त्यांचे मत देणे सोपे होणार आहे. जिल्ह्यातील सर्व दिव्यांग व्यक्ती व वयोवृद्ध नागरिकांनी सक्षम ॲप आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करून यामध्ये आवश्यक असणाऱ्या सुविधांचा लाभ घ्यावा. हे ॲप खऱ्या अर्थाने दिव्यांग आणि जेष्ठ नागरिकांसाठी वरदान ठरणार आहे, यात शंकाच नाही..!

**- मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे**

# चिरागनगर प्रवेशद्वारावरच्या जाहिरात फलकावर नक्की कोणाचा आशीर्वाद?



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता डोंबिवली(प्रतिनिधी) :** पदपथावर कोणत्याही प्रकारचे जाहिरात फलक लावू नये. असे उच्च न्यायालय मुंबई यांचे तसेच शासनाचे निर्देश असताना देखील ठाण्यात मात्र उच्च न्यायालय मुंबई व शासनाच्या निर्देशाची पायमल्ली होत असल्याचे चित्र सध्या सर्वच शहरात दिसून येत आहे. याच संदर्भात दिनांक ४ जुलै २०२४ रोजी माहिती अधिकार कार्यकर्त्या प्रीती ढमाले यांनी ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त यांच्याकडे ठाण्याच्या चिराग नगर प्रवेशद्वारावरील अनधिकृत होर्डिंग बाबत तक्रार करत अनधिकृत होर्डिंग निदर्शनास आणून दिले होते. परंतु आज तागायत यावर कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नसल्याचा आरोप माहिती अधिकार कार्यकर्त्या ढमाले यांनी केला आहे. तसेच २८ मे २०१९ रोजी उपआयुक्त संदीप माळवी यांनी देखील संबंधित ठेकेदाराला कार्यालयीन आदेशानुसार जाहिरात फलक त्वरित पाडण्यास सांगितले होते. चिराग नगर प्रवेशद्वारावरचे जाहिरात फलक हे सन २०१९ पासून सतत वादाच्या भोवऱ्यात असताना देखील मागील सहा वर्षापासून संबंधित अनधिकृत जाहिरात फलकावर अद्याप पर्यंत का कारवाई होत नाही. हा खूप मोठा प्रश्न निर्माण होत आहे. पालिका क्षेत्रात जाहिरात फलक लावण्या करता महाराष्ट्र महानगरपालिका नियम २००३ मधील तरतुदीनुसार आवश्यक त्या कागदपत्रांची छाननी करून परवानगी देण्यात येते. महाराष्ट्र शासनातर्फे सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वे देण्यात आली आहेत. त्यानुसार रस्त्याच्या रुंदीपासून १.५० मीटर एवढे अंतर ठेवण्यास व पदपथावर कोणतीही जाहिरात, तसेच जाहिरात फलक लावू नये असे निर्देश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे कोणताही जाहिरात फलक रस्त्यापासून १२.२ मीटर (४० फुट) पेक्षा अधिक उंचीवर उभारता येणार नाही असे नमूद केले आहे. असे निर्देश असताना देखील संबंधित अनधिकृत जाहिरात फलका संदर्भात मागील चार ते पाच महिन्यापूर्वी माहिती अधिकार कार्यकर्त्या प्रीती ढमाले यांनी ठाणे महानगर पालिकेचे उपआयुक्त यांच्याकडे तक्रार केली होती. पण त्या तक्रारीबाबत आजपर्यंत कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्याचे दिसून येते. सदर अनाधिकृत फलकांबाबत माहिती अधिकार अर्जात द्वारे माहिती मागून देखील सदरची माहिती अथवा माहिती अधिकार अर्जाला पालिका प्रशासनाकडून आजतागायत उत्तर दिले नाही. तसेच त्याच अर्जाबाबत अपील केले असता अपीलाचे देखील अद्याप पर्यंत कोणत्याही प्रकारे उत्तर मिळाले नाही. असे ही ढमाले यांनी सांगितले.

ठाणे महापालिकेच्या नागरी संशोधन केंद्र येथे नुकत्याच झालेल्या बैठकीत आयुक्त सौरभराव यांनी अनधिकृत जाहिराती, बॅनर्स, पोस्टर्स फलकांबाबत देखील कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. अनधिकृत जाहिरात बॅनर्स, होर्डिंग बाबत आयुक्त स्वतः आदेश देईपर्यंत हे अनधिकृत होर्डिंग जरा पण कोणाच्या निदर्शनास येत नसतील का ? हा देखील खूप मोठा प्रश्न उद्भवत आहे. तसेच लोकसेवक हे नक्की कोणासाठी काम करत आहेत. जे उच्च न्यायालय तसेच शासनाच्या नियमांना व आदेशांना पायदळी तुडवून उघडपणे भ्रष्टाचार करत आहेत. म्हणजे आता लोकसेवकांना कोणत्याही प्रकारे न्यायाल याची तसेच शासनाची भीती उरली नाही. असे या प्रकरणावरून दिसून येते, असे वक्तव्य माहिती अधिकार कार्यकर्त्या प्रीती ढमाले यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधत केले आहे.

# ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात पुढील आठवडाभर होणार रक्तदान शिबिराचे आयोजन



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :** असे म्हणतात की, एका व्यक्तीने रक्तदान केल्यानंतर त्या रक्ताचे सर्व महत्त्वाचे घटक बाजूला करून पाच लोकांचा जीव वाचविला जाऊ शकतो. म्हणूनच 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' असे मानले जाते. मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून रुग्णांना लागणाऱ्या रक्ताचा तुटवडा भासत होता. अशात दिवाळी ला नातेवाईकांकडे जाऊन त्यांची विचारपूस करत त्यांना आठवणीत राहील, अशी भेट देण्यापेक्षा ठाणे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार यांच्या प्रेरणादायी विचारातून दिवाळी निमित्ताने वि.सा.सामान्य रुग्णालय येथे भेट देऊन रक्तदान करण्याचे आवाहन केले. त्या आवाहनाला प्रतिसाद देत गुरुवार, दि.६ नोव्हेंबर २०२४ पासून पुढील एक आठवडा रक्तपेढी विभाग (ब्लड बँक), सिव्हील रूग्णालय, ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाजवळ, ठाणे येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

या प्रेरणादायी विचारांना कृतीत आणून जनजागृतीचे उत्तम उदाहरण म्हणजे अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धीरज महांगडे यांनी सर्वप्रथम रक्तदान करून या शिबिराची सुरुवात केली.

याप्रसंगी निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्यसंपर्क) डॉ.मृणाली राहुड, रक्तसंक्रमण अधिकारी डॉ.राजू काळे, रक्तसंक्रमण अधिकारी डॉ.गिरीश चौधरी, अधिसेविका श्रीमती प्रतिभा बर्डे या सर्वांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील कर्मचाऱ्यांना आवाहन करून जनजागृती केली.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार यांनी उपस्थित सर्व रुग्णालयीन अधिकारी व कर्मचार्यांचे आणि रक्तदात्यांचे कौतुक करून मनोबल वाढविले.

तरी इच्छुक रक्तदात्यांनी, स्वयंसेवी संस्थांनी,महाविद्यालयीन तरूण-तरूणींनी स्वेच्छेने रक्तदान करण्यास पुढाकार घ्यावा आणि गरजू रुग्णांना मदत करावी व रक्तदान करून या सामाजिक व राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार यांनी केले आहे.

# कल्याण ग्रामीण मतदार संघातील समस्यांसाठी लढण्याचा अपक्ष उमेदवार प्रियांका मयेकरांचा निर्धार



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता डोंबिवली(प्रतिनिधी) :** कल्याण डोंबिवलीतील ग्रामीण भागातील विकासासाठी आपण लढणार असून,त्यासाठी कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवित असल्याचे अपक्ष उमेदवार प्रियांका मयेकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.ग्रामीण भागात वीज, पाणी, रस्ते, प्राथमिक आणि उच्च शिक्षणापासून अनेक समाज घटक वंचित आहेत.त्या घटकांच्या न्याय हक्कासाठी लढणारी आहे, दस्तनोंदणी बंदमुळे सामान्य नागरिक आणि शासनाला आर्थिक फटका बसला आहे.त्यामुळे दस्त नोंदणी सुरु करावी.ठाकुर्ली, डोंबिवली, कोपर, दिवा येथुन ग्रामीण भागात वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी प्रयत्नशील रहाणार आहे.

लाडकी बहिण योजनेमुळे महिला परावलंबी होत आहे.त्याऐवजी महिलांचे स्वावलंबन आणि रोजगार याकडे लक्ष देणारअसल्याचे अपक्ष उमेदवार प्रियांका मयेकर यांनी सांगितले.

## ठाणे जिल्ह्यात १४ मतदारसंघांत...

पान १ वरून >>

सय्यद-चेजमेकर्स पार्टी, रियाज आजमी-सपा, जाहिद अन्सारी-वंचित बहुजन आघाडी,

वारिस पठाण-एमआयएम, अपक्ष-अस्मा चिखलीकर, आरिफ़ शेख, मोमिन मुशताक, मोहम्मद खान, विलास पाटील (काँग्रेस बंडखोर), शब्बीर मोमिन, शाकीर शेख

भिवंडी पूर्वः परशूराम पाल-बसपा, मनोज गुळवी-मनसे, संतोष शेट्टी-शिवसेना (शिंदे गट), नारायण वंगा-राईट टू रिकॉल पार्टी, रईस शेख-सपा, अपक्ष-इस्माईल रंगरेज, तेजस आढाव, प्रकाश वड्डेपेल्ली, रफिक मुल्ला, विशाल मोरे, शंकर मुटकिरी

कल्याण पश्चिमः विश्वनाथ भोईर (शिवसेना), सचिन बासरे (ठाकरे गट), अनिल द्विवेदी-राईट टू रिकॉल पार्टी, रजनी देवळेकर-समता पार्टी, संदिप नाईक-निर्भय महाराष्ट्र पार्टी, उल्हास भोईर-मनसे, गुरुनाथ म्हात्रे-अपक्ष, अय्याज मौलवी-वंचित बहुजन आघाडी, ममता वानखेडे-बसपा, अपक्ष-निलेश जैन, डॉ. विजय पगारे, सुनिल उतेकर, सुरेश जाधव, जयपाल कांबळे, ऐलान बरमावाला, वरुण पाटील-(भाजप बंडखोर), अनिल पाटील, कौस्तुभ बहुलेकर, कपिल सुर्यवंशी, अमित गायकवाड, राकेश मुथा, पंचशिला खडसे, सुरेश पंडागळे, निसार शेख

मुरबाडः किसन कथोरे-भाजप, सुभाष पवार-राष्ट्रवादी शरद पवार, संगीता चेंदवणकर-मनसे, सागर अहिरे-निर्भय महाराष्ट्र पार्टी, अपक्ष-प्राजक्ता येलवे, रवींद्र सोनवणे, शरद पाटील, शैलेश वडनेरे (राष्ट्रवादी शरद पवार बंडखोर), सुभाष पवार

अंबरनाथः किरण भालेराव-बसपा, बालाजी किणीकर-शिवसेना, राजेश वानखेडे-ठाकरे गट, तृनेश देवळेकर-समता पार्टी, राजू डिकोंडा-अभिनव भारत जनसेवा पक्ष्

रुपेश थोरात-रासप, रोहीदास कुचे-राईट टु रीकॉल पार्टी, ॲड. सतिश औसरमल-राष्ट्रीय मराठा पार्टी, सुधीर बागुल-वंचित बहुजन आघाडी, सुशिला कांबळे-बसपा (आंबेडकर), संतोष थोरात-पिपल्स पार्टी ऑफ इंडिया, अपक्ष-अपर्णा जाधव, जानु मानकर, देवीदास निकम, नारायण गायकवाड, राजेश असरोंडकर, राजेश वानखेडे, श्रीनिवास वाल्मिकी, सुजाता गायकवाड, सुनिल अहिरे, सुमेध भवार, सांगिता गुप्ता

उल्हासनगरः कुमार आयलानी-भाजप, ओमी कलानी-राष्ट्रवादी शरद पवार, भगवान भालेराव-मनसे

अमर जोशी-ऑल इंडीया फॉरवर्ड ब्लॉक, संजय गुप्ता-वंचीत बहुजन आघाडी, अमित उपाध्याय-राईट टु रिकॉल पार्टी, पूजा वाल्मीकी-बहुजन विकास आघाडी, शाबीर खान-पिस पार्टी, सयानी दिलीप-नागरिक विकास पार्टी, अपक्ष-अमित तोलानी, अनिज जयस्वाल, प्रमोद पालकर, प्रेमकुमार अग्रवाल, भारत राजवानी (गंगोत्री), राज चंदवानी, राजकुमार सोनी, शहा शेख, हितेश जेयस्वानी, हेमंत वालेछा

कल्याण पूर्वः धनंजय बोडारे-ठाकरे गट, मिलिंद ढगे-बसपा, सुलभा गायकवाड-भाजप, शैलेश तिवारी-प्रहार जनशक्ती पार्टी, विशाल पावशे-वंचित बहुजन आघाडी, प्रफुल नानोटे-राईट टू रिकॉल पार्टी, तृणेश देवळेकर-समता पार्टी, त्रिशला कांबळे-बसपा (आंबेडकर), हरिश्चंद्र पाटील-संघर्ष सेना, शालिनी वाघः रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए), अपक्ष-विवेक पांडे, महेश गायकवाड, सिताराम गायसमुद्रे, प्रविण घोरपडे, कैलाश चैनानी, धनंजय जोगदंड, महेश गायकवाड (शिवसेना बंडखोर)

डोंबिवलीः रवींद्र चव्हाण-भाजप, दीपेश म्हात्रे-ठाकरे गट, निलेश सानप-राईट टू रिकॉल पार्टी, सुरेंद्र कुमार गौतम-बसपा, सोनिया इंगोले-वंचित बहुजन आघाडी, अपक्ष-सरिता मोरे, आनंद दामोदर, रेखा रेडकर

कल्याण ग्रामीणः दीपक खंदारे-बसपा, प्रमोद पाटील-मनसे, राजेश मोरे-शिवसेना, सुभाष भोईर- ठाकरे गट, विकास इंगळे-वंचित बहुजन आघाडी, हबीबुर्रहमान खान-पीस पार्टी, अपक्ष-शिवा अय्यर, नरसिंग गायसमुद्रे, प्रियांका मयेकर, दिपक भालेराव, परेश बडवे, चंद्रकांत मोटे, अश्विनी गंगावणे

कोपरी पाचपाखाडीः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे-शिवसेना, केदार दिघे-ठाकरे गट, बाबुकुमार कांबळे-लोकराज्य पार्टी, सुशीला कांबळे-रिपब्लिकन बहुजन सेना, अपक्ष-अहमद शेख, जुम्मन पठाण, मनोज शिंदे-काँग्रेस बंडखोर, मुकेश तिवारी, सुरेश पाटिल-खेडे

ठाणेः संजय केळकर-भाजप, राजन विचारे-ठाकरे गट, अविनाश जाधव-मनसे, हिंदुराव पाटील-राष्ट्रीय मराठा पार्टी, यक्षित पटेल-राईट टू रिकॉल पार्टी, अमर आठवले-वंचित बहुजन आघाडी, नागेश जाधव-बसपा, अपक्ष-आरती भोसले

कळवा-मुंब्राः जितेंद्र आव्हाड-राष्ट्रवादी शरद पवार, नजीब मुल्ला-राष्ट्रवादी काँग्रेस, सुशांत सूर्यराव-मनसे, संतोष भालेराव-बसपा, अमीर अन्सारी-राष्ट्रीय उलामा काउन्सिल, नाज खान-बहुजन महा पार्टी, पंढरीनाथ गायकवाड-वंचित बहुजन आघाडी, मुबारक अंसारी-निर्भय महाराष्ट्र पार्टी, सरफराज खान-एआयएमआयएम, सरफराज शेख-सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया, ज्योत्स्ना हांडे-अपक्ष

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अँड. जयकुमार ए. रिजवानी